# देवी कवच

शशिकांत कोंडेजकर



# ।।देवी कवच।।

## (संस्कृत+मराठी)


## शशिकांत कोंडेजकर



### ई साहित्य प्रतिष्ठान

# ।।देवी कवच।। (संस्कृत+मराठी)

## कवी : श्री. शशिकांत कोंडेजकर


पत्ता : ए ३०२, मेघदूत, कोथरूड, पुणे.

चलध्वनी -९९६०२४१६१७

संपर्क – व्हॉट्सऍपक्र. 99602 41617

Email : sbkondejkar@yahoo.com



This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी या क्रमांकावर आपले नाव व गाव Whatsapp वर कळवा)

प्रकाशन : १५ ऑक्टोबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## श्री शशिकांत भगवान कोंडेजकर (काव्यानुवादक)



२००७ साली भाभा अणुसंशोधन केन्द्र मुंबई येथून वैज्ञानिक अधिकारी पदावरून निवृत्त. संस्कृतमधील गीता रामरक्षा आदींचे मराठी पद्य अनुवाद हे ई साहित्य वर प्रकाशित झालेले आहेत व त्यांच्या लिंक्स (दुवे) या पुस्तकाच्या शेवटच्या पानावर सापडतील. त्यांवर क्लिक केल्यावर ती पुस्तके उघडतील.

गुरुचरण अति निर्मल |
गुरुचरण किती मनोहर ||
गुरुच ईशरूप निर्गुण |
गुरुपद पंकज वंदनीय ||

गुरुवचन हाच श्र्वास |
गुरुपदेशी असे विश्र्वास ||
गुरुअनुग्रह हेच संजीवन |
गुरुकृपा आस ही मनोमन ||

अर्पण पत्रिका –

ही शब्दफुले

**परमपूज्य सद्गुरू**

**श्री पृथ्वीराज भालेराव श्री सुव्रतस्वामी**

यांचे चरणी समर्पित

# दोन शब्द

देवी सप्तशतीमधले देवी कवच आपल्या सर्वांग संरक्षणासाठी आणि आयु, धन, विद्या, यश, कीर्ती बरोबर, पुत्र पौत्र गोत्र उध्दारासाठी प्रचलित आहे. पूर्वी मी उल्लेखल्याप्रमाणे गीताप्रेसचे श्री दुर्गा सप्तशती हे पं. रामनारायणदत्त शास्त्री यांचे हिंदी अर्थासह पुस्तक आंतरजालावर उपलब्ध आहे. या व अशा पुस्तकांमुळे ही स्तोत्रे समजणे सोपे गेले. मूळ संस्कृतमधील स्तोत्र कानाला सुखद वाटते. त्याचा अर्थ मनाला सुखद वाटेल. ती लयीत म्हणणे कानाला आणि मनाला समाधान देतात. तीच अर्थ समजून म्हणणे संयुक्तिक वाटावे म्हणून मला ही मराठीत स्वान्तसुखाय पद्यरूपात करावीशी वाटली.

श्री. सुनीळ सामंत मराठीतल्या या विशाल “ई-साहित्य” या संकेतस्थळावर ही पुस्तिका आपणा सर्वांसाठी प्रसिध्द करीत आहेत. ज्यांना संस्कृत समजणे कठीण त्यांनाही ही मराठीत पद्यरूपात वाचतानाच अर्थही समजल्यास त्यात रुची उत्पन्न होईल अशी अपेक्षा आहे. हे पद्यानुवाद लयीत करण्याचा हा प्रयत्न केला आहे. यात जे बरोबर उतरलेत ते वर उल्लेखलेल्या लेखकांमुळे मला शक्य झाले आहे, त्यांच्यामुळे सरल अर्थ मला समजला. चूकभूल क्षमस्व! आपले अभिप्राय, विशेषतः काही चूक दिसल्यास, जाणून घेण्यास आवडेल.

आपला

श.भ.कोंडेजकर
कोथरूड, पुणे ४११०३८
चलध्वनी (मोबा.) ९९६०२४२१६१७
इ-मेल- sbkondejkar@yahoo.com.

॥अथ श्री देव्याः कवचम्॥

ॐ अस्य श्रीचण्डीकवचस्य ब्रह्मा ऋषिः, अनुष्टुप् छन्दः,
चामुण्डा देवता, अङ्गन्यासोक्तमातरो बीजम्, दिग्बन्धदेवतास्तत्त्वम्,
श्रीजगदम्बाप्रीत्यर्थे सप्तशतीपाठाङ्गत्वेन जपे विनियोगः।

ॐ नमश्चण्डिकायै॥

।।श्री देवी कवच।।

ॐ कारे प्रारंभ करा, या श्री चण्डिका देवी कवचास ।

याचे ऋषी ब्रह्मा अनुष्टुप छंद, देवता जाणा चामुण्डेस ।।

अंगन्यासानंतर मातर बीज, दिग्बंध तत्त्व देवतेस ।

सप्तशतीच्या पाठाचे अंग, जगदम्बेस्तव विनियोग जपास ।।

।। ॐ नमस्ते चण्डिकादेवी ।।

मार्कण्डेय उवाच

ॐ यद्गुह्यं परमं लोके सर्वरक्षाकरं नृणाम्।
यन्न कस्यचिदाख्यातं तन्मे ब्रूहि पितामह॥१॥

ॐ पितामह साधन कोणते, मनुष्यमात्रा सदा संरक्षिते ।
कोणा न कथिले अति गूढ ते, कोणत्या नामे विख्याते ॥१॥

ब्रह्मोवाच

अस्ति गुह्यतमं विप्र सर्वभूतोपकारकम्।
देव्यास्तु कवचं पुण्यं तच्छृणुष्व महामुने॥२॥

ऐक आता अतिगुह्य ब्राह्मणा, सर्व जगताच्या संरक्षणा ।
'देवी कवच' उपकार रक्षणा, कथितो महामुने तुज श्रवणा ॥२॥

प्रथमं शैलपुत्री च द्वितीयं ब्रह्मचारिणी।
तृतीयं चन्द्रघण्टेति कूष्माण्डेति चतुर्थकम् ॥३॥

शैलपुत्री नवदुर्गेत अग्रणी, मूर्ती दुसरी ब्रह्मचारिणी ।
चन्द्रघंटा तृतीय स्थानी, चौथी कृष्माण्डा दिसे शोभुनी ॥३॥

पञ्चमं स्कन्दमातेति षष्ठं कात्यायनीति च।
सप्तमं कालरात्रीति महागौरीति चाष्टमम्॥४॥

स्कन्दमाता पाचवीस म्हणती, कात्यायनी सहावी ती ।
सातवी पहा कालरात्री, आठवीची महागौरी ख्याती ॥४॥

नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिताः।
उक्तान्येतानि नामानि ब्रह्मणैव महात्मना॥५॥

नववी सिध्दिदात्री ज्ञात, अशा नवदुर्गा विख्यात ।
या सर्व नामांचा स्रोत, महात्मा वेदचि निश्चित ॥५॥

अग्निना दह्यमानस्तु शत्रुमध्ये गतो रणे।
विषमे दुर्गमे चैव भयार्ताः शरणं गताः॥६॥

अग्नीत जो वेढला त्याला, वा शत्रूने घेरला त्याला ।
विषम संकटी जो पडला, भयभीत जो शरण आला ॥६॥

न तेषां जायते किंचिदशुभं रणसंकटे।
नापदं तस्य पश्यामि शोकदुःखभयं न हि॥७॥

अशुभ न शिवेल त्याला, रणी दूर करील संकटाला ।
आपत्ती शोक दुःख भयाला, नष्टवील शरण जाता दुर्गेला ॥७॥

यैस्तु भक्त्या स्मृता नूनं तेषां वृद्धिः प्रजायते।
ये त्वां स्मरन्ति देवेशि रक्षसे तान्न संशयः॥८॥

भक्त जे स्मरती तुज नित्य, अभ्युदय तयांचा होई हे सत्य ।
देवेश्वरी तयांना तूच जी चिन्त्य, तयांच्या रक्षणी तू ठेवी सातत्य ॥८॥

प्रेतसंस्था तु चामुण्डा वाराही महिषासना।
ऐन्द्री गजसमारुढा वैष्णवी गरुडासना॥९॥

चामुण्डा आरूढ शवावरी, वाराही तशी महिषावरी ।
ऐरावतावर बसे ऐन्द्री, वैष्णवी बसे गरुडावरी ॥९॥

माहेश्वरी वृषारुढा कौमारी शिखिवाहना।
लक्ष्मीः पद्मासना देवी पद्महस्ता हरिप्रिया॥१०॥

बलिवर्दावरी बसे माहेश्वरी, केकारवी मोर वाहतो कौमारी ।
लक्ष्मीदेवी आसनस्थ कमलावरी, ती  विष्णुप्रिया कमल धरी करी ॥१०॥

श्वेतरुपधरा देवी ईश्वरी वृषवाहना।
ब्राह्मी हंससमारुढा सर्वाभरणभूषिता॥११॥

धवल शुभ्र रूप धारी, ईश्वरी शोभे पहा वृषभावरी ।
ब्राह्मी विराजमान हंसावरी, अमूप दागिने शोभती तिजवरी ॥११॥

इत्येता मातरः सर्वाः सर्वयोगसमन्विताः।
नानाभरणशोभाढ्या नानारत्नोपशोभिताः॥१२॥

अशा या सर्व आपल्या माता, योगादी शक्तीच मूर्तिमंता ।
वस्त्र आभूषणांनी शोभिता, अनेकानेक देवी रत्नांनी सुशोभिता ॥१२॥

दृश्यन्ते रथमारुढा देव्यः क्रोधसमाकुलाः।

शङ्खं चक्रं गदां शक्तिं हलं च मुसलायुधम्॥१३॥

रथारूढ देवींचा भाव, क्रोधाचा प्रभाव तयांमधे ।

शंख चक्र गदा आणि, नांगर मुसळादि आयुधे ॥१३॥

खेटकं तोमरं चैव परशुं पाशमेव च।

कुन्तायुधं त्रिशूलं च शार्ङ्गमायुधमुत्तमम्॥१४॥

हाती ढाल भाल्यासम अस्त्र, सवे  परशू आणि पाशही ।

कुन्त आणि त्रिशूळ तसे, उत्तम शार्ङ्ग नामे धनुष्यही ॥१४॥

दैत्यानां देहनाशाय भक्तानामभयाय च।
धारयन्त्यायुधानीत्थं देवानां च हिताय वै॥१५॥

शस्त्रे विविध धारिती त्या, दैत्यांच्या पारिपत्यास्तव ।
अभय भक्तजनांना देण्या, तसे देवतांच्या हितास्तव ॥१५॥

नमस्तेऽस्तु महारौद्रे महाघोरपराक्रमे।
महाबले महोत्साहे महाभयविनाशिनि॥१६॥

भीषणा महारौद्र मुखविस्तार , पराक्रम तसा पहा महाघोर ।
बलवान उत्साहपूर्ण देवी, महाभयनाशिनीला  नमस्कार ॥१६॥

त्राहि मां देवि दुष्प्रेक्ष्ये शत्रूणां भयवर्धिनि।
प्राच्यां रक्षतु मामैन्द्री आग्नेय्यामग्निदेवता॥१७॥

कठिण तुज पाहणे चक्षूला, भय वाढवी तूच शत्रूला ।
रक्षो मज ऐन्द्री पूर्वेला , रक्ष अग्निदेवी आग्नेयेला ॥१७॥

दक्षिणेऽवतु वाराही नैर्ऋत्यां खड्गधारिणी।
प्रतीच्यां वारुणी रक्षेद् वायव्यां मृगवाहिनी॥१८॥

वाराही संरक्षो दक्षिणेला, नैऋत्य दिशे खड्गधारिणी ।
वायव्येस देवी मृगवाहिनी, पश्चिमेस तशी देवी वारुणी ॥१८॥

उदीच्यां पातु कौमारी ऐशान्यां शूलधारिणी।
ऊर्ध्वं ब्रह्माणि मे रक्षेदधस्ताद् वैष्णवी तथा॥१९॥

रक्ष कौमारी उत्तरेकडे, रक्ष शूलधारिणी ईशान्येकडे ।
रक्षण वरून करो ब्रह्माणी, वैष्णवी रक्षो निम्न दिशेकडे ॥१९॥

एवं दश दिशो रक्षेच्चामुण्डा शववाहना।
जया मे चाग्रतः पातु विजया पातु पृष्ठतः॥२०॥

कलेवर जिचे वाहन ती चामुण्डा, दाही दिशांनी मज रक्षो ।
समोरील संकटे सारो जया,पृष्ठभाग विजयादेवी रक्षो ॥२०॥

अजिता वामपार्श्वे तु दक्षिणे चापराजिता।
शिखामुद्योतिनि रक्षेदुमा मूर्ध्नि व्यवस्थिता॥२१॥

अजिता रक्षो वामभाग, उजवीकडे अपराजिता रक्षो ।
शिखेच्या रक्षणा उद्योतिनी, मस्तकी राहुनि उमा त्यास रक्षो ॥२१॥

मालाधरी ललाटे च भ्रुवौ रक्षेद् यशस्विनी।
त्रिनेत्रा च भ्रुवोर्मध्ये यमघण्टा च नासिके॥२२॥

मालाधारी देवी कपाळ माझे रक्षो, दोन्ही भुवयांना यशस्विनी रक्षो ।
भुवयांचा मध्यभाग त्रिनेत्री देवी रक्षो, नाकास यमघण्टा देवी रक्षो ॥२२॥

शङ्खिनी चक्षुषोर्मध्ये श्रोत्रयोर्द्वारवासिनी।
कपोलौ कालिका रक्षेत्कर्णमूले तु शांकरी॥२३॥

नेत्रांमधील भागा शङ्खिनी, कर्णांना द्वारवासिनी देवी ।
गालांना कालिका देवी रक्षो, कर्णमूळ रक्षो शांकरी देवी ॥२३॥

नासिकायां सुगन्धा च उत्तरोष्ठे च चर्चिका।
अधरे चामृतकला जिह्वायां च सरस्वती॥२४॥

सुगंधा नासिकांना रक्षो, वरील ओठ चर्चिका रक्षो ।
अधरोष्ठाला अमृतकला रक्षो, जिव्हा माता सरस्वती रक्षो ॥२४॥

दन्तान् रक्षतु कौमारी कण्ठदेशे तु चण्डिका।
घण्टिकां चित्रघण्टा च महामाया च तालुके ॥२५॥

दातांचे कौमारी रक्षण करो, चण्डिका तशी कण्ठ रक्षो ।
स्वरग्रंथी चित्रघण्टा रक्षो, टाळू महामाया देवी रक्षो ॥२५॥

कामाक्षी चिबुकं रक्षेद् वाचं मे सर्वमङ्गला।
ग्रीवायां भद्रकाली च पृष्ठवंशे धनुर्धरी॥२६॥

कामाक्षी हनुवटीला रक्षो, सर्वमङ्गला वाणी रक्षो ।
मानेला भद्रकाली रक्षो, पाठकणा धनुर्धरी रक्षो ॥२६॥

नीलग्रीवा बहिःकण्ठे नलिकां नलकूबरी।
स्कन्धयोः खड्गिनी रक्षेद् बाहू मे वज्रधारिणी॥२७॥

कण्ठाला नीलग्रीवा रक्षो, कण्ठनलिका नलकुबेरी रक्षो ।
खांद्यांना खड्गिनी रक्षो, बाहू वज्रधारिणी रक्षो ॥२७॥

हस्तयोर्दण्डिनी रक्षेदम्बिका चाङ्गुलीषु च।
नखाञ्छूलेश्वरी रक्षेत्कुक्षौ रक्षेत्कुलेश्वरी॥२८॥

दण्डिनी हातांचे रक्षण करो, बोटांना अम्बिका रक्षो ।
नखांचे शूलेश्वरी रक्षण करो, कुशींना कुलेश्वरी रक्षो ॥२८॥

स्तनौ रक्षेन्महादेवी मनः शोकविनाशिनी।
हृदये ललिता देवी उदरे शूलधारिणी॥२९॥

स्तनांचे रक्षण महादेवी, मन रक्षो शोकविनाशिनी ।
हृदयाचे रक्षण ललितादेवी, उदर रक्षो शूलधारिणी ॥२९॥

नाभौ च कामिनी रक्षेद् गुह्यं गुह्येश्वरी तथा।
पूतना कामिका मेढ्रं गुदे महिषवाहिनी ॥३०॥

नाभीस कामिनीचे रक्षण, गुह्यभागी गुह्येश्वरी रक्षो ।
लिंग रक्षणा पूतना कामिका, गुद महिषवाहिनी रक्षो ॥३०॥

कट्यां भगवती रक्षेज्जानुनी विन्ध्यवासिनी।
जङ्घे महाबला रक्षेत्सर्वकामप्रदायिनी ॥३१॥

कटिभागा रक्षो भगवती, गुडघ्यांना विन्ध्यवासिनी ।
मांड्यांचे रक्षण करो, महाबला जी कामप्रदायिनी ॥३१॥

गुल्फयोर्नारसिंही च पादपृष्ठे तु तैजसी।
पादाङ्गुलीषु श्री रक्षेत्पादाधस्तलवासिनी॥३२॥

घोट्यांचे रक्षण नारसिंही करो, तैजस्वी देवी चरणा रक्षो ।
पायांची बोटे श्रीदेवी, तळव्यांना तलवासिनी रक्षो ॥३२॥

नखान् दंष्ट्राकराली च केशांश्चैवोर्ध्वकेशिनी।
रोमकूपेषु कौबेरी त्वचं वागीश्वरी तथा॥३३॥

दंष्ट्राकराली नखे रक्षो, केसांना ऊर्ध्वकेशिनी रक्षो ।
रोमरोम कौबेरी रक्षो, वागीश्वरी सर्व त्वचा रक्षो ॥३३॥

रक्तमज्जावसामांसान्यस्थिमेदांसि पार्वती।
अन्त्राणि कालरात्रिश्च पित्तं च मुकुटेश्वरी॥३४॥

रक्त मज्जा चरबी मांस, अस्थि रक्षो पार्वतीदेवी ।
आतडे रक्षो कालरात्रि, मुकुटेश्वरी पित्तास रक्षवी ॥३४॥

पद्मावती पद्मकोशे कफे चूडामणिस्तथा।
ज्वालामुखी नखज्वालामभेद्या सर्वसंधिषु॥३५॥

मूलाधारादि षट्चक्रे पद्मावती, चूडामणी कफ रक्षो ।
नखांचे तेज ज्वालामुखी,अभेद्या सर्व सांधे रक्षो ॥३५॥

शुक्रं ब्रह्माणि मे रक्षेच्छायां छत्रेश्वरी तथा।
अहंकारं मनो बुद्धिं रक्षेन्मे धर्मधारिणी॥३६॥

ब्रह्माणि माझे वीर्य रक्षो, माझी सावली रक्षो छत्रेश्वरी ।
अहंकार मन बुध्दी यांना, रक्षो धर्मधारिणी ईश्वरी ॥३६॥

प्राणापानौ तथा व्यानमुदानं च समानकम्।
वज्रहस्ता च मे रक्षेत्प्राणं कल्याणशोभना॥३७॥

प्राण अपान व्यान उदान समान, वायू हे मम तनूतील ।
रक्षो वज्रहस्ता देवी, कल्याणशोभना मम प्राण रक्षील ॥३७॥

रसे रुपे च गन्धे च शब्दे स्पर्शे च योगिनी।
सत्त्वं रजस्तमश्चैव रक्षेन्नारायणी सदा॥३८॥

रस रूप गंध शब्द स्पर्श, या तन्मात्रा रक्षो योगिनी ।
सत्व रज तम या त्रिगुणा, सर्वदा रक्षो नारायणी ॥३८॥

आयू रक्षतु वाराही धर्मं रक्षतु वैष्णवी।
यशः कीर्तिं च लक्ष्मीं च धनं विद्यां च चक्रिणी॥३९॥

आयु मम रक्षो वाराही, धर्माचे रक्षण वैष्णवी करो ।
यश कीर्ती धन लक्ष्मी विद्या, यांचे रक्षण चक्रिणी करो ॥३९॥

गोत्रमिन्द्राणि मे रक्षेत्पशून्मे रक्ष चण्डिके।
पुत्रान् रक्षेन्महालक्ष्मीभार्यां रक्षतु भैरवी॥४०॥

मम गोत्र रक्षो इन्द्राणि, पशुधन माझे चण्डिका रक्षो ।
पुत्रांचे रक्षण महालक्ष्मी, अर्धांगिनीस भैरवी रक्षो ॥४०॥

पन्थानं सुपथा रक्षेन्मार्गं क्षेमकरी तथा।
राजद्वारे महालक्ष्मीर्विजया सर्वतः स्थिता॥४१॥

माझ्या पथ आणि मार्गांना, सुपथा तथा क्षेमकरी रक्षो।
सन्मुख नृपाधीपा महालक्ष्मी, सर्व भयात विजया रक्षो॥४१॥

रक्षाहीनं तु यत्स्थानं वर्जितं कवचेन तु।
तत्सर्वं रक्ष मे देवि जयन्ती पापनाशिनी॥४२॥

अशी स्थाने जी रक्षारहित, राहून गेली कवचात।
त्याही सर्व जागांचा समावेश, देवी जयन्ती करो रक्षित॥४२॥

पदमेकं न गच्छेत्तु यदीच्छेच्छुभमात्मनः।
कवचेनावृतो नित्यं यत्र यत्रैव गच्छति॥४३॥

क्षेम साधण्या आपले, विनाकवच नको कुठे जाणे ।
कोठेही जाण्या आधीच, नित्य कवच जप करणे ॥४३॥

तत्र तत्रार्थलाभश्च विजयः सार्वकामिकः।
यं यं चिन्तयते कामं तं तं प्राप्नोति निश्चितम्।
परमैश्वर्यमतुलं प्राप्स्यते भूतले पुमान्॥४४॥

कवचरक्षित जो जिथे जाई, धन विजय कामना प्राप्त ।
इष्ट वस्तू जी जी इच्छील, निश्चित ते ते तया प्राप्त ।
भूलोकी अशा पुरुषास, अतुलनीय ऐश्वर्य प्राप्त ॥४४॥

निर्भयो जायते मर्त्यः संग्रामेष्वपराजितः।
त्रैलोक्ये तु भवेत्पूज्यः कवचेनावृतः पुमान्॥४५॥

ज्याने धारिले हे कवच, त्यास नाही कोणते भय ।
अपराजित युध्दात तो, तिन्ही लोकी तो पूजनीय ॥४५॥

इदं तु देव्याः कवचं देवानामपि दुर्लभम् ।
यः पठेत्प्रयतो नित्यं त्रिसन्ध्यं श्रद्धयान्वितः॥४६॥

हे जे देवीचे कवच , दुर्लभ देवतांनाही असे ।
पठण याचे दैनंदिन, श्रध्देने त्रिकाल जो करितसे ॥४६॥

दैवी कला भवेत्तस्य त्रैलोक्येष्वपराजितः।
जीवेद् वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः। ४७॥

त्यास प्राप्ती दैवी कलेची, त्रैलोकात तो अपराजित असे ।
शताधीक शरद तो पाही, अकालमृत्युभय त्यास नसे ॥४७॥

नश्यन्ति व्याधयः सर्वे लूताविस्फोटकादयः।
स्थावरं जङ्गमं चैव कृत्रिमं चापि यद्विषम्॥४८॥

कांजिण्या कोड आदी व्याधी, सर्व रोग नाश पावती ।
विषारी दंश वनस्पती रसायन, यांचेही दुष्परिणाम नष्टती ॥४८॥

अभिचाराणि सर्वाणि मन्त्रयन्त्राणि भूतले।

भूचराः खेचराश्चैव जलजाश्चोपदेशिकाः॥४९॥

अभिचार मारण उच्चाटन, यांचे मन्त्र वा यन्त्र ।

ग्रामदेवता आकाशगण, अथवा जलदेवता आणि तन्त्र ॥४९॥

सहजा कुलजा माला डाकिनी शाकिनी तथा।

अन्तरिक्षचरा घोरा डाकिन्यश्च महाबलाः॥५०॥

सटवाई महाबला वा गंडमाला, डाकिनी शाकिनी तशा ।

अंतरिक्षातील रौद्र डाकिनी, सहजा कुलजा तशा ॥५०॥

ग्रहभूतपिशाचाश्च यक्षगन्धर्वराक्षसाः।
ब्रह्मराक्षसवेतालाः कूष्माण्डा भैरवादयः ॥५१॥

भूत पिशाच्च ग्रह भैरव, यक्ष गंधर्व राक्षसांची बाधा।
ब्रह्मराक्षस कुष्माण्ड बळी, वेताळ अशा अनिष्ठ बाधा ॥५१॥

नश्यन्ति दर्शनात्तस्य कवचे हृदि संस्थिते।
मानोन्नतिर्भवेद् राज्ञस्तेजोवृद्धिकरं परम्॥५२॥

दूर होती ही दुष्ट संकटे, जो पवित्र देवी कवच धारी।
राजासम मानसन्मान तयाला, तेज त्याचे पसरे खरोखरी ॥५२॥

यशसा वर्धते सोऽपि कीर्तिमण्डितभूतले।
जपेत्सप्तशतीं चण्डीं कृत्वा तु कवचं पुरा॥५३॥

कवचासह चण्डिपाठ केल्यास, फळ मिळे त्या पुरुषास ।
वृध्दि होई तयाच्या यशास, तशीच भूतली कीर्ती तयास ॥५३॥

यावद्भूमण्डलं धत्ते सशैलवनकाननम्।
तावत्तिष्ठति मेदिन्यां संततिः पुत्रपौत्रिकी॥५४॥

जोवरी ही वसुंधरा आहे, जोवर आहे वन कानन पर्वत ।
तोवरी तयाचा वंश राहे, पुत्र पौत्र संतानासहित ॥५४॥

देहान्ते परमं स्थानं यत्सुरैरपि दुर्लभम्।
प्राप्नोति पुरुषो नित्यं महामायाप्रसादतः॥५५॥

महामाया भगवती प्रसादे, परमपद जे देवदुर्लभ ।
हा देह त्यागल्यानंतर, त्या पदाचा त्यास लाभ ॥५५॥

लभते परमं रुपं शिवेन सह मोदते॥ॐ॥५६॥

सुंदर दिव्य रूप लाभे त्यास, शिवासह आनंदधामी वास ॥ॐ॥५६॥

इति देव्याः कवचं सम्पूर्णम्।


॥देवी कवच संपूर्ण॥


परमपूज्य श्री सद्गुरू सुव्रत ।
यांचे कृपेने हे लेखन स्फुरत ॥
वरदहस्त त्यांचा लाभो सतत ।
प्रार्थितो हा लीन शशिकांत ॥


पद्यांतर
शं.भ.कोंडेजकर
रेणुका पंचमी १२-१-२०२३

**श्री. शशिकांत कोंडेजकर लिखित व ई साहित्य प्रतिष्ठान प्रकाशित पाच पुस्तके.**

**यांच्या कव्हरवर क्लिक करताच उघडतील.**





हनुमानचाळीशी
मराठी अनुवाद- शशिकांत कोंडेजकर
महावीर विक्रम बजरंगी । कुमति निवार सुमति के संगी ॥
कंचन बरन बिराज सुबेसा । कानन कुंडल कुंचित केसा ॥


देवी
अथर्वशीर्ष
सप्तश्लोकी
संस्कृत+मराठी श्लोकानुवाद
शशिकांत
कोंडेजकर

•


श्रीमद्भगवद्गीता
मराठी श्लोकानुवाद
भगवान कोंडेजकर